जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०६/२०२४
## दि.२४/०६/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३९८/२०२४,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २५ रा.येरवडा पुणे |
| **आरोपीत** | १)इस्माईल रियाज शेख वय २४ रा.राजीवगांधीनगर येरवडा पुणे २) संकेत उमेश गुप्ता वय २१ रा.गल्ली नं.१३ राजीव गांधीनगर येरवडा पुणे (आरोपी ताब्यात घेतलेले आहे) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/६/२०२४ रोजी दुपारी १३/३० वा.चे सुमारास मेंटल हॉस्पीटल क्वार्टरचे मोकळया जागेत गल्ली नं.११ चे समोर राजीव गांधीनगर येरवडा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी याचा सावत्र भाऊ याने यातील नमुद इसम इस्माईल हीचे बहीणीशी लग्न केले त्याचा राग मनात धरुन यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे वडील कठाळु कचरुबा लहाडे वय ६० वर्ष रा.रा.स.नं.११५ राजीव गांधीनगर मेंटल कॉर्नर आळंदी रोड येरवडा पुणे यांचे वर कोयत्याने वार करुन गंभीर जखमी करुन त्यांना जिवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मिथुन सावंत मो.नं.९३७२४६८७०७ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे १७८/२०२४,भादविक ३०७,५०९,३२३,५०४,४०६ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३७ वर्ष,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपीत** | फिर्यादी यांचे पती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०५/२०२४ रोजी रात्री २२/०० ते २२/१५ वा.चे सुमारास श्याम मेडिकल अँड सर्जिकल स्टोअर्स डावी भुसारी कॉलनी,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे पती यांच्यात कौटुंबिक वाद सुरू आहेत.सदर वादातून फिर्यादी यांचे पती फिर्यादी यांच्याकडे सतत घटस्फोटाची मागणी करत आहेत.वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी पतीकडे घर खर्चासाठी पैसे मागितले तसेच फिर्यादी ह्या घटस्फोट देत नसल्याचा राग अनावर होऊन,फिर्यादी यांना हाताने मारहाण केली व शिवीगाळ करुन फिर्यादी यांना ढकलून देऊन रस्त्यावर खाली पाडले आणि फिर्यादी यांचे छातीवर बसून दोन्ही हाताने त्यांचा गळा आवळून, मारूनच टाकतो तुला असे म्हणून फिर्यादी यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.प्रेमा पाटील मो.नं.८१०८१०७४७९ |

**३.**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे.३९३/२०२४,भादविक ४२०,४१९,१७०,३४,माहिती तंज्ञत्रान कायदा कलम ६६ डी |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७३ वर्षे रा.वानवडी, पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०६/२०२४ रोजी १४/३८ वा.ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद इसम यांनी पोलीस असल्याचे बतावणी करुन फिर्यादी यांना गैरकृती या बाबत भीती दाखवुन २५,००,०००/- रू.ची फसवणुक केली आहे. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.राजेद्र करणकोट मो.नं.८८७९७०६०८८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २१८/२०२४,भादविक ३०७,३२६,३२३,४५२,५०४,५०६(२),४२७,१४३,१४४,१४७,१४८, १४९क्रिमीनल लॉ अमेडमेंट ॲक्ट कलम ०७, आर्म अक्ट कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २० वर्षे रा.दांडेकर पुल पुणे |
| **आरोपीत** | पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०२४ रोजी सायं.१७/३०वा. सुमा.सर्वे नं १३०,दांडेकर पुल पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद इसम यांनी नमुद ठिकाणी जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे वर लोंखडी हत्याराने वार करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली व खल्लास करुन टाकण्याची धमकी देवुन तेथील दुचाकीची तोडफोड केली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.युवराज पाटील मो नं ९६५७०१७४७४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ९०/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्षे रा.रिव्हेन्यु कॉलनी, शिवाजीनगर पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०६/२०२४ रोजी रात्रौ २२/३०वा.चे.सुमा.घोले रोड कडे जाणेसाठी शिर्के यांचे बंगल्या समोरील रोडवर डेक्कन पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणावरून मोबाईल पाहत पायी जात असताना,नमुद इसम याने त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना दिशा विचारण्याचा बहाणा करून फिर्यादी यांचे कडील ६०,०००/-रू. कि.चा मोबाईल जबरी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सावंत मो नं ९०२१९२१०२२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७४७/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ८१ वर्षे रा.एन आय बी एम रोड,कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०४/२०२४ रोजी पासुन ते दि.२५/०४/२०२४ रोजी पर्यत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना तुमचे खाते मनी लॉड्रींग करीता वापरले असल्याचे सांगुन त्याची चौकशी करावयाची असल्याचे भासवुन फिर्यादीच्या बँक खाते वरून वेगवेगळ्या ट्रान्झॅक्शनव्दारे ३६,४०,०००/- रू. ट्रान्सफर करण्यास भाग पाडून फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.मानसिंग पाटील मो.नं.९९२२००८७६८ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६२३/२०२४,भादविक २७९,३३८,३०४(अ)मो.वा.का कलम ११९/१७७ |
| **फिर्यादी** | शंकर क्षिरसागर पोलीस अंमलदार लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | एस टी बस चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०६/२०२४ रोजी स. ०८/५७ वा.चे सुमा.मौजे वाघोली गावचे हद्दीत रेमंड शोरुमचे समोरील पुणे ते अहमदनगर जाणारे रोडवर लेन नंबर १ रोड वरती डिवायडर लगत |
| **तपशिल** | यातील नमुद एस टी बस चालकांने त्याचे ताब्यातील एस.टी.बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एका अनोळखी इसमास जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.खटके पो.स्टे.नं.९५२७०६९१०० |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १५८/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५१ वर्षे रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०२४ ते आजपावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अज्ञात मोबाईल धारक यांनी शेअर्स ट्रेडिंगमध्ये नफ्याबाबत प्रलोभन दाखवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादी यांना ४४,०४,०००/-रू.गुंतविण्यास भाग पाडून काही एक परतावा न देता फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक लोंढे फोन नं.०२०/२४२८२००३ |

**प्रेस नोट दि.२५/०६/२०२४**

**<u>दि.२५/०६/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**९**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३९४/२०२४,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | संदिप वाघ पोलीस अंमलदार वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०२४ रोजी २२/४४ वा चे पूर्वी विक्रमबात्रा वसाहतचे समोर, केंद्रीय महाविद्यालयचे बाजूला, लुल्लानगर, वानवडी पुणे येथे आर्मी एरियातील मोकळ्या जागेत(डिफेन्स लॅन्ड) |
| **तपशिल** | यातील नमुद ठिकाणी एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे,(नाव,पत्ता माहिती नाही) यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन लाकडी दांडक्याने तसेच अन्य कोणत्या तरी धारदार हत्याराने गंभीर जखमी करुन त्याचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.राजेद्र करणकोट मो.नं.८८७९७०६०८८ |

**१०**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४०२ /२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६९ वर्षे रा.कल्याणी नगर येरवडा, पुणे, |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०२४ रोजी २०/१५ वा.दत्तमंदीर ममता किराणा दुकाना जवळ, बँक ऑफ बडोदा कल्याणी नगर येरवडा पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रहाते घरातुन चालण्या करीता बाहेर पडले त्यानंतर ते चालत चालत नमुद ठिकाणी आले असता तेथे थांबून मोबाईल पहात असताना मोटार सायकल वरुन आलेल्या नमुद दोन इसमांनी फिर्यादी यांचे हातातील ५०,०००/-रू.किं.चा मोबाईल हिसका मारुन जबरदस्तीने नेला |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लामखडे मो.नं.९९२३८९६३८९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**